# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024

# उद्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी पेटून उठण्याची गरज : प्रा. नितीन बानुगडे-पाटील

पाटण, दि. २५ : घटनेने दिलेल्या मताची किंमत जाणून त्याचा आदर ठेवल्यास सर्वसामान्य माणूस परिवर्तनातून स्वतःचे भवितव्य घडवू शकतो. यापुढील काळात भ्रमाचे सिंह बाजूला करून कर्तृत्वाचे सिंह पुढे आणण्याची गरज असून असलेल्या सामर्थ्याची फक्त जाणीव करून देण्याची गरज आहे. राजसत्ता अपयशी ठरत असताना समाजाला उभे रहावे लागते. देशाला दिशा देणारे राज्य आज कोणत्या दिशेने निघाले आहे? जातीवर जात आणि धर्मावर धर्म घासून उडलेल्या ठिणग्यांनी पेटलेल्या आगीत राजकीय स्वार्थाच्या पोळ्या भाजल्या जात आहेत. ज्ञानसत्तेकडून धर्मसत्तेकडे होणारी वाटचाल भयावह असून सध्या विचारभिन्नतेचे नाहीतर विचारशून्यतेच्या राजकारणाने सामाजिक पाया उद्ध्वस्त होत असताना उद्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी पेटून उठण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ख्यातनाम वक्ते प्रा. नितीन बानुगडे पाटील यांनी केले.

येथील कोयना शिक्षण संस्था, सामाजिक शास्त्र मंडळ व सॉक्रिटिस क्लबच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र काल, आज आणि उद्याफ या विषयावर आयोजित समाजप्रबोधनपर जाहीर व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कोयना एज्युकेशन सोसायटीचे सचिव अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. शिरीषकुमार पवार, शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) तालुका प्रमुख सुरेश पाटील, दीपकसिंह पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



मार्गदर्शन करताना प्रा. नितीन बानुगडे-पाटील, व्यासपीठावर अमरसिंह पाटणकर, याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, प्रा. शिरीषकुमार पवार, सुरेश पाटील.

प्रा. नितीन बानुगडे-पाटील म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जातिधर्मांना एकत्र घेऊन जनतेचे राज्य उभे केले. त्यांचाच वसा घेऊन शाहू, फुले, आंबेडकरांनी महाराष्ट्र उभा केला. पण सध्या महाराष्ट्राची परिस्थिती पाहता जाती-जातीत विष पेरण्याचे काम सुरू आहे. एकसंध असलेला महाराष्ट्र संपवण्याचा घाट सुरू आहे, हे थांबवण्याचे काम आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाने दिलेल्या मतांचा हक्क बजावून आपण हे बदललं पाहिजे आणि शिवरायांच्या स्वप्नातले राज्य स्थापित केले पाहिजे. सध्या दिशा आणि दशा बदलण्याचे सामर्थ्य असलेल्या महाराष्ट्रातील खेडोपाड्यातील शाळा बंद करण्यात येत असून ६० हजार शाळा कंपन्यांच्या घशात घातल्या जात आहेत. नोकऱ्यांचे कंत्राटीकरण यामुळे राज्याचा सामाजिक पायाच उद्ध्वस्त केला जात आहे. मुंबई महाराष्ट्राचा प्राण असून मुंबईसह महाराष्ट्राला खिळखिळीत करण्याचा उद्देश आहे. समर्पित होणाऱ्या कार्यकर्त्यांचे मोहोळ असलेल्या याच राज्यात स्वातंत्र्याची पहिली ठिणगी पडली. महाराष्ट्र संपत नाही, महाराष्ट्र संपवत असतो. तुमचे भविष्य तुमचेच आहे आणि ते तुम्हालाच घडवावे लागेल. महाराष्ट्र ज्ञानाने व ग्रंथाने घडला आहे. शिवरायांनी लोकनीतीने स्वराज्य निर्माण केले, आता राजनीती समाज उद्ध्वस्त करत असून लोकशाहीची थट्टा सुरू आहे. शेती, शिक्षण, उद्योग, आरोग्य या प्रश्नांसाठी तसेच उद्याचा महाराष्ट्र घडविण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन लढले पाहिजे, असे आवाहन प्रा. नितीन बानुगडे-पाटील यांनी केले.

अमरसिंह पाटणकर म्हणाले, आजची सामाजिक परिस्थिती निराशाजनक असून भरकटत चालली आहे. चांगल्या वाईटातून जीवन घडविण्याची प्रत्येकात क्षमता आहे. ज्ञानाचा उपयोग करून समृद्ध जीवन घडवायचे असून मांडीला मांडी आणि खांद्याला खांदा लावून गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या समाजाचे जातिधर्मांच्या नावाखाली तुकडे पाडण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य शिरीषकुमार पवार यांनी आभार मानले. प्रा. डॉ. विनायक राऊत आणि प्रा. डॉ. दीपक पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, विविध संस्थांचे पदाधिकारी, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच कोयना परिवारातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आमदार आणि आता पक्ष पळवणे कसली संस्कृती?**

पूर्वी मतपेट्या पळवत, नंतर आमदार पळवायला लागले आणि आता तर पक्षच पळवतात. ही कसली लोकशाही? आपण यावर विचार केला पाहिजे. आपल्या मताचा किती आदर आणि किती अधिकार आहे हे महत्वाचं आहे. नेते विकले गेले तरी माझं संविधान सुरक्षित राहील कारण माझं संविधान सर्वसामान्य माणसाच्या हातात आहे आणि माझा सर्वसामान्य माणसांवर विश्वास आहे. उद्याचं भविष्य सर्वसामान्य माणूस घडवू शकतो ही वस्तुस्थिती आहे. आपल्यातही सामर्थ्य आहे. आपणही एक होवून महाराष्ट्रासाठी उभे राहिलो पाहिजे आणि महाराष्ट्र संपत नसतो हे येणाऱ्या काळात दाखवून देवूया, असे आवाहन प्रा. नितीन बानुगडे-पाटील यांनी केले.